पुढारी

शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना 'विवेकानंद'तर्फे मदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने पूरग्रस्त भागातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (करमाळा, जि. सोलापूर) येथील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी १ लाख २८ हजार रुपयांची मदत केली.

करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय(करमाळा, जि. सोलापूर) येथील विद्यार्थ्यांना सॅक, वह्या, फराळाचे पदार्थांचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडे खरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. उपक्रमाचे संयोजन डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी केले.

तरुण भारत

शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. अब्दुल कलाम जयंती

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज मधील ग्रंथालय मराठी विभाग एनसीसी व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए.पी.जे .अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधानातील उद्देशिका ,मूलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन विद्यार्थी व प्राध्यापक यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर .कुंभार असे म्हणाले की डॉ.ए.पी.जे . अब्दुल कलाम हे विद्यार्थी प्रेमी, उत्तम वाचक होते. त्यांचा आदर्श समोर ठेवत विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांच्या आहारी न जाता वाचनाकडे वळावे. वाचाल तर वाचाल असा संदेश देत त्यांनी वाचनाचे असणारे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमा पूजनाने झाली कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. बीए भाग तीनची विद्यार्थिनी श्रावणी अडसूळ हिने मनोगत व्यक्त केले. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. एनसीसी प्रमुख प्रा. मेजर सुनिता भोसले प्रा.रोहिणी रेळेकर व ग्रंथालयातील सर्व स्टाफ व बहुसंख्येने विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत 17/10/25

# 'विवेकानंद'तर्फे करमाळा येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने राज्यातील पूरग्रस्त भागातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर येथील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी स्वइच्छेने आर्थिक मदत केली. यात १ लाख २८ हजार ६३० इतकी रक्कम जमा झाली.

यावेळी प्रत्यक्ष करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करुन यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर येथील विद्यार्थ्यांना सॅक, वहया, फराळाचे पदार्थ इत्यादीचे वाटप केले व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडेखरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यानी पुढाकार घेतला. या उपक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. एस. पी. थोरात, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.श्रुती जोशी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए एस कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस एस अंकुशराव, प्रा ए बी वसेकर, रजिस्ट्रार एस के धनवडे यांनी केले.

16/10/25